**कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.**

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १५.०९.२०१५ रोजी दु. ३.०० वा झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत एकही शासकीय सदस्य उपस्थित नसल्याने बैठक गणपूर्ती अभावी तहकूब झाल्याबाबत.**

संदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ओमप्रकाश यादव | : | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | श्रीम. मेघा धवल आपटे | : | मालक प्रतिनिधी |
| ३. | श्री. श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ४. | श्री. सतिश मगर | : | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |

बैठकीच्या सुरुवातीस मा. कामगार आयुक्त व मा. सहसचिव (कामगार) यांची मा. मंत्री महोदयांकडे बैठक लागली असल्याने ते मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहू शकणार नसल्याचे व याबाबत मा. कामगार आयुक्तांनी मा. अध्यक्ष यांना कळविले असल्याचे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच मा. संचालक (लेखा व कोषागारे) हे बैठकीस उपस्थित राहणार असल्याचे कळविले आहे. असेही सचिव यांनी सांगितले. यावर मा. अध्यक्ष यांनी सचिव यांना मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांना दुरध्वनी वरुन विचारण्यास सांगितले. सचिव यांनी मा. संचालक (लेखा व कोषागारे) यांना दुरध्वनी द्वारे विचारणा केली असता त्यांनी त्यांची प्रकृती खराब असल्यामुळे ते मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहू शकणार नाही, असे कळविल्याचे सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

अर्धातास वाट पाहूनही शासकीय प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यामुळे गणपूर्ती अभावी बैठक तहकूब करण्यात येत आहे. असे मा. अध्यक्ष यांनी उपस्थित सदस्यांना सांगितले.

मा. अध्यक्ष व उपस्थित सदस्यांचे आभार मानून पुढील बैठकीचा दिनांक मा. अध्यक्षांनी कळविल्यानंतर सर्व सदस्यांना कळविण्यात येईल. असे ठरले..

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर
बांधकाम कामगार कल्याणकारी
मंडळ, मुंबई-४०० ०५१.